MHND100016232023

# आदेश निशाणी ०५ वर

(दिनांक २४ एप्रिल, २०२५)

वादींनी निशाणी क्र.०५ वरील अर्ज आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता नुसार शेत सर्वे नंबर १४८/३/अ एकूण क्षेत्रफळ ०२ हेक्टर ९८ आर पैकी ०.३३ आर जमीन, ज्याची चतुर्सिमा पुर्वेस – नारायण भागवत बिडवई यांची प्लॉटींग, पश्चिमेस –दिलीप लक्ष्मणसिंग ठाकूर यांची जमीन, दक्षिणेस – संतोष पुंडलक बदरके यांची प्लॉटींग, उत्तरेस – राजा ड्रेसेस यांची मोकळी जागा, स्थित मौजे. मानसपूरी, ता.कंधार, जि.नांदेड (यापुढे सदर मालमत्तेस 'वादमिळकत' असे संबोधले आहे) या जमीनीत प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी गहान, दान, विक्री करू नये, असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, शेत सर्वे नंबर १४८/३/अ, स्थित मौजे. मानसपूरी, ता.कंधार, जि.नांदेड मध्ये वादींचे वडील गोविंद आबाजी नागलवाड यांच्या हिस्स्यास त्यांच्या कुटूंबातील वडीलोपार्जीत एकूण जमीनीपैकी ०.४५ आर जमीन वाटणीत आली होती. वादी क्र.१ व २ व त्यांचा मयत भाऊ संतोष पि. गोविंद नागलवाड हे तिघे प्रतिवादी क्र. १ गोविंदचे कायदेशीर वारस होते. वारस संतोष याचा दिनांक २७.०८.२०१४ रोजी मृत्यू झाला असून त्याची वारसदार वादी क्र.५ आहेत. प्रतिवादी क्र १ चे वादी क्र.१ ते ५ कायदेशीर वारस असून अविभक्त हिंदू एकत्र कुटूंब असल्यामुळे गोविंद यांच्या वादग्रस्त जमीनीचे कायदेशीर वारस आहेत.

३. वादींचे पुढे असे कथन आहे की, गोविंद यांच्या हिस्स्यास वादग्रस्त शेत सर्वे नंबर १४८ हिस्सा क्र.३(अ) मध्ये जी ०.४५ आर जमीन आली होती त्यापैकी प्रतिवादी क्र.१ याने ०.१२ आर जमीन सुभाष मठपती यांना विक्री केली होती त्याबद्दल वादींना आक्षेप नाही. प्रतिवादी क्र.१ हा नंतर दारूच्या व्यसनाच्या आहारी गेला व त्याने कोणतीही कौटूंबिक गरज नसताना प्रतिवादी क्र.२ शी संगनमत करून वादग्रस्त ०.३३ आर जमीनीपैकी ०.१२ आर जमीन प्रतिवादी क्र.३ यांना खरेदीखत क्र.४४३८/२००३ रक्कम रूपये वीस हजार मध्ये विक्री केली असून उर्वरित २१,०००/– जमीन प्रतिवादी क्र.४ याला खरेदीखत क्र.९०८३/२००५ द्वारे विक्री केली. सदर दोन्ही बैनामे केल्याचे वादींना प्रतिवादींनी कोणतीही माहिती होऊ दिली नाही किंवा वादींची संमती घेतली नाही. वादग्रस्त वादमिळकत ही वादीची एकत्र कुटूंबाची वडीलोपार्जीत

मालमत्ता असून त्याची कोणतीही वाटणी वादी तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यात अदयाप झालेली नाही. वादमिळकतीमध्ये वादी हे ३/४ हिस्स्याचे कायदेशीर हक्कदार असल्यामुळे त्यांच्या संमतीशिवाय वादग्रस्त जमीन विक्री करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता व नाही.

**४.** वादींचे पुढे असे कथन आहे की, वादींनी दिनांक २१.०७.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ यास वाटणी करून मागितली असता प्रतिवादी क्र.१ याने कोणतीही जमीन शिल्लक नाही, सर्व जमीन विक्री केली असे सांगून वाटणी करून देण्यास इन्कार केला. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला. वादींचा दावा प्रथम दर्शनी सिध्द होण्यासारखा असून दाव्याचे संतुलन संपूर्णपणे वादीच्या हक्कात आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या नावावर वादमिळकत असल्यामुळे त्यांनी वादमिळकत त्रयस्थास विक्री अथवा हस्तांतरण केल्यास वादींना हक्कापासून वंचित व्हावे लागेल. त्यामुळे वादींचे कशाने ही न भरून येणारे नुकसान होणार आहे. जर प्रतिवादी क्र.३ व ४ विरूद्ध तात्पुरता मनाई हुकूम दिल्यास त्यामध्ये प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तरी दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी वादमिळकत इतर कोणासही गहाण, दान, विक्री, बय करू नये अशा तात्पुरता मनाई हुकूम देण्याची विनंती वादींनी केली आहे.

**५.** प्रतिवादी क्र.१ व २ यांना पुरेसी संधी देऊनही त्यांनी त्यांची लेखी कैफियत दाखल केले नसल्यामुळे प्रस्तुत दावा प्रतिवादी क्रं १ व २ विरुध्द विनाम्हणणे चालवण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र.४ यांना न्यायालयाचे समन्स तामिल होऊन देखील ते न्यायालयात हजर झाले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्रं ४ विरुध्द एकतर्फा चालवण्यात आला. प्रतिवादी क्र.३ यांनी सदर दाव्यावरील त्यांचे लेखी कैफियत निशाणी क्र.२८ वर सादर करून मनाई हुकूमाच्या अर्जावरील म्हणणे निशाणी क्र.३० वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुत अर्जाच्या उत्तरामध्ये असे कथन केले की, वादींनी दावा मुदतीत दाखल केला नाही. तसेच वादींचा वादमिळकतीवर ताबा नसल्यामुळे वादींना प्रतिवादींविरूद्ध मनाई हूकूमाचा दावा दाखल करता येणार नाही. तसेच प्रस्तुत दावा दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ७ नियम ११ (ड) नुसार रद्द होण्यास पात्र ठरतो. तसेच प्रतिवादी क्र.१ ने गट क्र.१४८/३/अ मधील संपूर्ण ०.४५ आर जमीन विक्री केल्यामुळे प्रतिवादी क्र.३ चा दस्त क्रमांक ४४३८/२००३ नुसार ०.१२ आर जमीनीमध्ये मालकी व ताबा कायम ठरतो. तसेच वादींचा व प्रतिवादी क्र.१ चा वादग्रस्त जमीनीवर ताबा नसल्यामुळे प्रतिवादी क्र.३ ला मनाई हुकूमाच्या आदेशाद्वारे वादमिळकतीमधून बेदखल करता येणार नाही. म्हणून वादींचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

**६.** वादींतर्फे वकील श्री. एन.एम.शेख यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी क्र.३ यांचा तसेच त्यांच्या विधीज्ञांचा वारंवार पूकारा केला असता गैरहजर राहिल्याने तसेच प्रतिवादी क्र.३ तर्फे कोणताही अर्ज दाखल न केल्याने दिनांक ११.०४.२०२५ रोजी निशाणी क्र.०५ खाली आदेश पारित करून प्रस्तुतचा अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी ठेवण्यात आला.

**७.** दोन्ही बाजुच्या कथनावरुन खालील मुद्दे निर्णयाकरीता उदभवले असून त्यावर माझी निष्कर्ष कारण मिमांसासह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **कारणमिमांसा** |
|---|---|---|
| १. | वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे काय ? | **नाही** |
| २. | वादींच्या बाजुने दाव्याचा समतोल आहे काय ? | **नाही** |
| ३. | जर वादींच्या बाजुने तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश पारीत केला नाही तर वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | **नाही** |
| ४. | काय आदेश ? | **निशाणी क्र.५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## :: कारणमिमांसा ::

**मुददा क्रं १ ते ३ :–**

**८.** मुददा क्रं १ ते ३ वस्तुस्थितीची पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रितपणे निर्णयाकरीता घेतले आहे.

**९.** वादींनी अर्जाच्या कथनाच्या अनुषंगाने निशाणी क्र.०७ लगत शेत गट क्र.१४८/३/अ चा नमूना नं. ८–अ व ७/१२ उता–याच्या प्रती, तसेच शेत गट क्र.१४८/३/अ च्या जुना ७/१२ उता–याची प्रत, खरेदीखत क्र. ४४३८/२००३ व ९०८३/२००५ च्या प्रमाणित प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत.

**१०.** वादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादमिळकत ही प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या नावावर असून प्रतिवादी क्र.३ व ४ यांना खरेदीखत क्र. ४४३८/२००३ व ९०८३/२००५ नुसार वादमिळकती विक्री केल्याचे दिसून येते. तसेच सदरचे खरेदीखत १८ ते २० वर्षापूर्वी नोंदणीकृत केलेले असून सदर खरेदीखताविरूद्ध १८ ते

२० वर्षापर्यंत वादींतर्फे कोणताही आक्षेप  घेतला किंवा कसे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. तसेच वादमिळकतीवर प्रतिवादी क्र.३ व ४ यांचा नोंदणीकृत खरेदीखताद्वारे मालकी व ताबा असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र.३ व ४ हे वादमिळकतीचे नोंदणीकृत खरेदीदार असल्यामुळे त्यांच्याविरूद्ध मनाई हुकूम आदेश पारित करणे न्यायोचीत होणार नाही. तसेच वादींनी असे कथन केले की, वादमिळकत ही प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या नावे असल्यामुळे प्रतिवादी क्र.३ व ४ हे वादमिळकत त्रयस्थ व्यक्तीला विक्री किंवा हस्तांतरण करण्याची शक्यता आहे, परंतू वादींनी प्रतिवादी क्र.३ व ४ हे वादग्रस्त मालमत्ता त्रयस्थ व्यक्तीला हस्तांतरीत करीत असल्याबाबतचा प्रथम दर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. एकंदरीत पाहता वादीच्या बाजुने प्रथम दर्शनी केस व दाव्याचा समतोल दिसुन येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाच्या वस्तुस्थीतीच्या अनुषंगाने वादींना सदर अर्जातील प्रार्थना केल्या प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मंजुर केला नाही तर वादींचे पैश्याच्या स्वरुपात भरुन न येणारे अपरिमीत नुकसान होईल असा निष्कर्ष काढता येणार नाही. सबब, सदरहु कारणमीमांसामुळे मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुददा क्रं ४ :–**

**११.** मुद्दा क्रमांक १ ते ३ ला नोंदविलेल्या कारणमीमांसा व निष्कर्षामुळे सदरहु अर्ज निशाणी क्र.५ नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.०४ च्या उत्तरार्थ मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

Digitally signed by SAKHARE MANISHA BALAJI
Date: 2025.04.24 15:55:29 +0530

दि. २४.०४.२०२५

(म.बा.साखरे)

३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

कंधार